पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९**

**सभावृत्तांत**

दिनांक : **२०/०७/२०१६** वेळ : दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२०/०७/२०१६** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.जावेद रमजान शेख
३. मा.ओव्हाळ शेखर अशोक
४. मा.ननवरे जितेंद्र बाबा
५. मा.तानाजी विठ्ठल खाडे
६. मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
७. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
८. मा.पवार संगीता शाम

या शिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.दुरगुडे, मा.अष्टीकर - सहाय्यक आयुक्त, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये समाविष्ट करणेत आले.**

विषय क्र.३) भोसरी महोत्सव आयोजित करणेबाबत – मा.नितीन लांडगे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) मधुकर पवळे व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.संगीता पवार, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) महापौर चषक जिल्हास्तर रोलबॉल स्पर्धा २०१६ - १७ आयोजित करणेबाबत – मा.संगीता पवार, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) मानधनावर नियुक्ती करणेबाबत – मा.अरुण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) राज्यस्तरीय खो-खो स्पर्धा आयोजित करणेबाबत –मा.अरुण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) अभ्यासिका, एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी.चे स्पर्धा परीक्षाकेंद्र सुरु करणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

दिनांक **०७/०७/२०१६ व ११/०७/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १८ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ६७ | विषय क्रमांक – ०१

दिनांक - २०/०७/२०१६ | विभाग - क्रीडा

सुचक : मा.तानाजी खाडे | अनुमोदक : मा.जितेंद्र ननवरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/६३/२०१६, दि.०२/०७/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महिला व बालकल्याण समिती सभा दिनांक १३/०७/२०१६ ठराव क्रमांक २० नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजने विभागा मार्फत महिला व बालकल्याण योजने अंतर्गंत महिला/मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षण देणे ही योजना वस्ती पातळीवर राबविणेकामी प्रति लाभार्थी –

महिला/मुली वयोगट 5 ते 16 प्रति लाभार्थी र.रू.147/- निविदेनुसार अंदाजित 48.99 % कमी,

महिला/मुली वयोगट 17 ते 26 प्रति लाभार्थी र.रू.148/- निविदेनुसार अंदाजित 49.33% कमी,

महिला/मुली वयोगट 27 ते 45 प्रति लाभार्थी र.रू.149/- निविदेनुसार अंदाजित 49.66 % कमी या दरात अ, ब, क, ड, ई व फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील महिला/मुलींना कुंगफु-कराटे प्रशिक्षण पुणे डिस्ट्रीक्ट स्पोर्टस कराटे असोशिएशन चिंचवड यांचे मार्फत पिं.चिं.म.न.पा. परिसरातील प्रस्तावात नमुद महिला/मुली लाभार्थीसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती) ची पुर्तता करणा-या प्रस्तावात नमुद अभ्यासक्रमानुसार महिला/मुलींना वस्ती पातळीवर दि.31/3/2017 अखेर पर्यंतच्या कालावधित कुंगफु-कराटे प्रशिक्षण रोज दीड तास या प्रमाणे एकूण 20 दिवसाच्या (30 तास) प्रति लाभार्थी प्रस्तावात नमुद वयोगटानुसार प्रशिक्षण योजना राबविणे कामी निविदेनुसार होणा-या रक्कमेस अथवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी व आवश्यकते नुसार सदर योजऩेत बदल दुरूस्ती करण्याचा व त्यानुसार लाभ देणेचा अधिकार मा.आयुक्त सो. यांना देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ६८ | विषय क्रमांक – ०२

दिनांक - २०/०७/२०१६ | विभाग - क्रीडा

सुचक : मा.तानाजी खाडे | अनुमोदक : मा.जितेंद्र ननवरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/९२/२०१६, दि.०१/०६/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.महापालिका सभा ठराव क्र.१२०६, दि.२०/१०/२०११ व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.क्रीडा/७/कावि/१८८/२०१२, दि.०४/०७/२०१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे क्रीडा धोरण व सदर आदेशातील अट क्र.१० मध्ये खेळाडू दत्तक योजनेअंतर्गत निवड झालेल्या खेळाडूने सलग २ वर्षात

राज्य, राष्ट्रीय, व आंतरविद्यापीठ स्तरावर प्राविण्य न मिळविल्यास अशा खेळाडूंना तेथून पुढे या योजनेचा लाभ दिला जाणार नाही असे नमुद आहे. त्यानुसार खेळाडू दत्तक योजना २०१४-१५ व २०१५-१६ चे लाभार्थी ४५ खेळाडूंच्या प्राविण्याबाबत संबंधित क्रीडा पर्यवेक्षक व क्रीडा अधिकारी यांनी तपासणी केली असता प्रस्तावात नमुद १६ खेळाडू पात्र असा अहवाल क्रीडा विभागास दिलेला आहे. १६ पात्र खेळाडूंना खेळाडू दत्तक योजना २०१६-१७ चा लाभ १ वर्षाकरिता देणेस व त्याकामी येणा-या र.रु.२६,३४,४००/- चे खर्चास व सदरचा खर्च खेळाडू दत्तक योजना या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.जितेंद्र ननवरे　　　　　　　　　　　　　　अनुमोदक – मा.तानाजी खाडे

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक २०/०७/२०१६ ची पाक्षिक सभा सोमवार दि. **२५/०७/२०१६** रोजी **सकाळी ११.००** वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** सोमवार दि. **२५/०७/२०१६** रोजी **सकाळी ११.००** वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – १९**
**सभावृत्तांत**
( दिनांक २०/०७/२०१६ ची तहकूब सभा )

दिनांक : **२५/०७/२०१६** वेळ : सकाळी **११.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक **२०/०७/२०१६** ची तहकूब सभा सोमवार दिनांक **२५/०७/२०१६** रोजी सकाळी **११.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.ननवरे जितेंद्र बाबा
३. मा.तानाजी विठ्ठल खाडे
४. मा.पवार संगीता शाम

या शिवाय मा.गावडे – सह आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक – मा.संगीता पवार

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक २५/०७/२०१६ सकाळी ११.०० ची तहकूब सभा सोमवार दि. **२५/०७/२०१६** रोजी **दुपारी ४.००** वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.
सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** सोमवार दि. **२५/०७/२०१६** रोजी **दुपारी ४.००** वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( मासुळकर समीर मोरेश्वर )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १९**

**सभावृत्तांत**

( दिनांक २०/०७/२०१६ व २५/०७/२०१६ स.११.०० वा. ची तहकूब सभा )

दिनांक : **२५/०७/२०१६** वेळ : दुपारी **४.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक **२५/०७/२०१६** सकाळी ११.०० ची तहकूब सभा सोमवार दिनांक **२५/०७/२०१६** रोजी दुपारी **४.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.तानाजी विठ्ठल खाडे
३. मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
४. मा.पवार संगीता शाम

या शिवाय मा.तानाजी शिंदे – अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.गावडे – सह आयुक्त, मा.दुरगुडे – सहा.आयुक्त, मा.बेंडे – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ६९ विषय क्रमांक – ०३
दिनांक - २५/०७/२०१६
सुचक : मा.नितीन लांडगे अनुमोदक : मा.तानाजी खाडे
संदर्भ : मा.नितीन लांडगे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव –

भोसरी हे या शहरातील ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले आणि कला, संस्कृती, क्रीडा परंपरा जपणारे गांव आहे. प्रतिवर्षी गणेशोत्सवाचे काळामध्ये भोसरी कला क्रीडा मंचाच्यावतीने भोसरी कला व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यामध्ये नाटय, काव्य, लोक परंपरा, इ. कार्यक्रम घेण्यात येतात. त्यासाठी कोणत्याही नागरिकाकडून कोणतेही शुल्क घेण्यात येत नाही. हा महोत्सव नागरिकांची सांस्कृतिक भूक भागविणारा असून शहराच्या वैभवात भर घालणारा आहे. यावर्षीपासून महानगरपालिकेच्या क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या सहकार्याने व भोसरी कला, क्रीडा मंचाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यास आणि त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७०                                                    विषय क्रमांक – ०४

दिनांक - २५/०७/२०१६

सुचक : मा.संगीता पवार                                              अनुमोदक : मा.नितीन लांडगे

संदर्भ : मा.संगीता पवार, मा.नितीन लांडगे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.११ येथील मधुकर पवळे व्यायामशाळा, राजनगर ही व्यायामशाळा जयभवानी मित्रमंडळ, यमुनानगर या संस्थेस दरमहा सेवाशुल्क र.रु.२०००/- मनपाकडून देऊन ११ महिने कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१                                                    विषय क्रमांक – ०५

दिनांक - २५/०७/२०१६

सुचक : मा.संगीता पवार                                              अनुमोदक : मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा.संगीता पवार, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व पुणे जिल्हा रोलबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने पिंपरी चिंचवड शहर रोलबॉल असोसिएशन तसेच प्रबोधनकार विकास क्रीडा संस्था, यमुनानगर यांच्या संयुक्त विद्यमाने माहे ऑगष्ट/सप्टेंबर २०१६ मध्ये प्रबोधनकार ठाकरे मैदानावरील स्केटिंग रिंग, यमुनानगर, निगडी येथे महापौर चषक जिल्हास्तर रोलबॉल स्पर्धा २०१६-१७ आयोजित करणेस व त्याकामी प्रस्तावात नमुद प्रमाणे येणा-या र.रु.३,४८,५४४/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता, तसेच स्पर्धा अनुषंगाने एकूण खर्च र.रु.३,४८,५४४/- मधील स्टेज, मंडप, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च एकूण र.रु.६०,०००/- हा स्थापत्य विषयक खर्च स्थापत्य विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व विद्युत स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.४०,०००/- हा विद्युत विषयक खर्च विद्युत विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च र.रु.२,४८,५४४/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७२                                                    विषय क्रमांक – ०६

दिनांक - २५/०७/२०१६

सुचक : मा.तानाजी खाडे                                              अनुमोदक : मा.संगीता पवार

संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाकडे नियमित भरती बंद असल्यामुळे व क्रीडा विभागाकडे मनुष्यबळ कमी असल्यामुळे क्रीडा विभागाकडून वर्षभर कबड्डी, खो-खो, फुटबॉल, व्हॉलीबॉल असा विविध महापौर चषक स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेसाठी ग्राऊंड आखणेसाठी मनुष्यबळ नसल्यामुळे बाहेरुन काम करुन घ्यावे लागते. त्यामुळे या कामातील तज्ञ व अनुभवी श्री.सैफन रजाक शेख यांची सहा महिने कालावधीसाठी दरमहा र.रु.१०,०००/- मानधनावर नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३ विषय क्रमांक – ०७

दिनांक - २५/०७/२०१६

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.नितीन लांडगे

संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.९ शाहूनगर येथे मनपाने विकसित केलेले कै.सदाशिव बहिरवाडे क्रिडांगण असून गेली अनेक वर्ष या क्रिडांगणावर एकही स्पर्धा झालेली नाही. तरी राज्यस्तर खो-खो च्या स्पर्धा या क्रिडांगणावर घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४ विषय क्रमांक – ०८

दिनांक - २५/०७/२०१६

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.नितीन लांडगे

संदर्भ : मा.तानाजी खाडे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.२१ मध्ये प्रेमलोक पार्क येथील शाळेत ६ वर्ग खोल्या व हॉल रिकामा आहे. त्या ठिकाणी अभ्यासिका, एम.पी.एस.सी. व यु.पी.एस.सी.चे स्पर्धा परीक्षाकेंद्र सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३९४/२०१६
दिनांक : २६/०७/२०१६ चे लगत.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.